# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/११/२०२२ (शुक्रवार) सकाळ

## जबर दुखापत

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील गुजरखेडी येथे दिनांक २३/११/२०२२ ते २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. अनिता शैलेन्द्र भोंडे, वय २७ वर्ष, रा. गुजरखेडी हिचा पती जखमी नामे—शैलेंद्र भोंडे हा आरोपी नामे— शिवा वाघाडे, रा. गुजरखेडी यांच्याकडे दारू मागण्यास गेला असता तिथे आरोपी शिवा वाघाडे व त्याचा मित्र नामे —दिनेश निकोसे यांचे भांडण सुरू होते. नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या पतीने आरोपी शिवाला दारू मागीतली त्यावरून त्याने शिवीगाळ करणे सुरू केले. त्यावरून फिर्यादीचे पतीने म्हटले की, ''मला शिवीगाळ करू नको'' असे म्हणुन ते घरी परत येण्यास निघाले असता आरोपीने शिवाने लाकडी काठीने फिर्यादीच्या पतीला डोक्यावर मारून जखमी केले व शिवीगाळ करून धमकी दिली तसेच फिर्यादीने त्याला हटकले असता फिर्यादीला सुदधा चाकुने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक बोळगीर मो.नं: ९८३४२१९३०९ हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा वरोडा येथे दिनांक २४/११/२०२२ चे दुपारी १३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— कुमरेसिंग गंभीरसिंग ठाकुर, वय ५० वर्ष, रा. वरोडा हा घटना वेळी व ठिकाणी घरी हजर असतांना आरोपी नामे— अंकीत कुमरेसिंग ठाकुर, रा. हेटी ता. नरखेड याने फिर्यादीच्या घरी येवुन म्हटले की, ''मला घराचा हीस्सा पाहिजे'' यावर फिर्यादीने नकार दिला असता आरोपीने फिर्यादी सोबत झगडा भांडण करून फिर्यादीला हातबुक्कीने तोंडावर मारले. त्यामुळे फिर्यादीच्या वरच्या जबडयातील वरचा दात पडला व फिर्यादीला जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास अधिकारी पोलीस हवालदार गंगाधर ठाकरे ब. नं. १६५९ मो. नं. ९९२३९०८३८२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर